**जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा**

**विषय:- जिल्हा उद्योग मित्र, जिल्हा सल्लागार समिती व आजारी उद्योग पुनर्वसन समिती बैठक दिनांक १३/११/२००९ चे इतिवृत्त.**

## जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा

**मा.श्री.डॉ.रामास्वामी एन, जिल्हाधिकारी तथा उद्योग उप आयुक्त, बुलडाणा यांच्या अध्यक्षेखाली संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र बैठक दिनांक १३/११/२००९ चे इतिवृत्त.**

| अ. क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| | | मागील बैठकीचे इतिवृत्त पारीत करणे. | दिनांक २७/०७/२००९ रोजी संपन्न झोलेल्या बैठकीचे इतिवृत्त सर्वानुमते पारीत करण्यांत आले. | |
| ०१ | अध्यक्ष, मलकापुर एमआयडीसी इंड.असो. | मलकापुर औद्योगिक क्षेत्रातील भुखंडावर पोलीस स्टेशन सुरु होणे बाबत. | एमआयडीसी मलकापुर औद्योगिक क्षेत्रामध्ये पोलीस स्टेशनसाठी प्रशासकीय इमारत बांधणे बाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचेकडुन अंदाजपत्रक दि.२४/०७/२००९ ला मागविण्यांत आले आहे परंतु अद्याप प्राप्त झालेले नाही. पुन्हा स्मरणपत्र देवुन पाठपुरावा करण्यांत येवुन प्रस्ताव प्राप्त होताच वरिष्ठ कार्यालयमार्फत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्यांत येईल असे बैठकीत श्री.गांवडे, पोलीस निरीक्षक, बुलडाणा यांनी सांगितले.<br>मा.अध्यक्ष यांनी पोलीस विभागाने पुढील कार्यवाहीचा अनुपालन अहवाल जि.उ.कें. कडे त्वरीत पाठवावा असे सुचित केले. | जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलडाणा |
| २ | अध्यक्ष, खामगांव इंड.असो. | खामगांव औद्योगिक क्षेत्रातील पोलीस विभागास दिलेल्या जागेबाबत | या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पोअबु/पशा-४/एमआयडीसी/भुखंड बांधकाम/०९-१४००३ए दिनांक २४/९/२००९ अन्वये रु.४२.११ लक्ष खर्चाचे उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांनी बांधकामाचे अंदापत्रक नकाशासह मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती यांचेकडे पाठविले असून दिनांक १२/१०/२००९ अन्वये पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई कार्यालयास मंजूरी व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यांत आला असल्याचे बैठकीत श्री.गांवडे, पोलीस निरीक्षक, बुलडाणा यांनी सांगितले. सदर प्रस्ताव शासन मान्यता व निधी करीता प्रलंबीत असल्यामुळे सदरचा **विषय या बैठकीमधुन वळण्यांत यावा असे ठरले.** | जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलडाणा |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०३ | जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा | येळगांव एमआयडीसी येथील विज व अंतर्गत रस्त्याबाबत | म.रा.वि.वि.कं.ने पायाभूत सुविधा आराखडयात प्रस्तावीत केलेल्या साखळी बु. येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रामधून एमआयडीसी, एरीया येळगांव साठी स्वतंत्र एक्सप्रेस फिडर डीडीएफ योजने मध्ये उभारणी करता येईल.<br>सदर उपकेंद्राचा प्लॅन मंजूर झाला असुन कामाची ऑर्डर देण्यांत आली आहे. परंतु साईट पर्यंत जाण्यास ॲप्रोच रोड नसल्यामुळे कामाची सुरुवात झाली नसल्याचे अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.,बुलडाणा यांनी बैठकीत सांगितले असता महाव्यवस्थापक, जिउकें/संघटना प्रतिनिधी /उप अभियंता,मऔविम व अधिक्षक अभियंता, मराविविकं यानी सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी करावी व पुढील निर्णय घ्यावा असे मा. अध्यक्ष यांनी सुचित केले. | अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता, मराविविकंम, बुलडाणा उप अभियंता, मऔविम, अकोला |
| ०४ | मलकापूर ॲन्ड एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी इंड. असो. मलकापूर | दसरखेड (मलकापूर) औद्योगिक क्षेत्रात फायर स्टेशन व्यवस्था होणे बाबत | दसरखेड (मलकापूर) औद्यो.क्षेत्रात फायर स्टेशन उभारणी झाल्यानंतर त्याचा ताबा संघटनेला देण्यांत आल्यानंतर फायर स्टेशन देखभाल खर्च वार्षिक ६ लाख आहे व सदर रक्कम संघटनेस खर्च करणे शक्य नाही तसेच एमआयडीसी फायरची कुठलीही सेवा पुरवित नसतांना उद्योजकांकडुन फायर चार्जेस वसुल करीत आहे असे सचिव, इंड.असो.मलकापुर यांनी २७/७/२००९ च्या बैठकीत सांगितले असता एमआयडीसीनेच फायर स्टेशनची उभारणी करावी व त्यांनी फायर स्टेशनची देखभाल ठेवावी व उद्योजकांकडुन फायर सर्व्हीस चार्जेस वसुल करावे असा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, मऔविम, अकोला यांनी त्यांचे वरिष्ठ कार्यालयास सादर करावा अशा सुचना दिनांक २७.०७.२००९ च्या बैठकीत मा.आमदार श्री.चैनसुखजी संचेती यांनी दिल्या.<br>दि.१३.११.२००९ च्या बैठकीत उप अभियंता, मऔविम, खामगांव यांनी सांगितले की, प्रस्ताव अग्नीशामक अधिकारी, नागपुर यांचेकडे पाठविलेला आहे. | कार्यकारी अभियंता, / उप अभियंता, मऔविम, अकोला/खामगांव |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| | | | तेव्हा मा.अध्यक्ष यांनी पुढील सद्यस्थिती काय आहे याची विचारणा केली असता सदर माहिती उपलब्ध नसल्याचे उप अभियंता, मऔविम, खामगांव यांनी बैठकीत सांगितले असता या पुढे बैठकीला येतांना सर्व मुद्यांची सद्यस्थितीसह उपस्थित राहावे असे सुचित कले व स्वतः पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल त्वरीत सादर करावा असेही कार्यकारी अभ्यिंता म.औ.वि.म. यांना सुचित केले. | |
| ०५ | सचिव, सहकारी औद्यो.वसाहत, शेगांव | सहकारी औद्योगिक वसाहत, शेगांव या संस्थेचे सन २००१-०२ ते २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण न करुन घेतल्या बाबत तसेच संस्थेच्या माजी अध्यक्षांकडील कायर्भार हस्तांतरणाबाबत. | **०१.** संस्थेचे पुर्वीचे अध्यक्ष यांनी नविन संचालक मंडळाकडे कार्यभार सोपविलेला नाही तो सोपविण्यांकरीता महाव्यवस्थापक, जिउकें यांनी स्वतः प्रयत्न करावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचित केले.<br><br>०२. संस्थेच्या लेखा परिक्षण अहवालाची प्रत सहा.निबंधक, सहकारी संस्था, शेगांव यांचेकडुन प्राप्त करुन जिउकेंला त्वरीत सादर करण्यांस बैठकीला उपस्थित असलेले सहा.सहकार अधिकारी यांना मा.अध्यक्ष यांनी सुचित केले. | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा<br><br>सहा.निबंधक, सहकारी संस्था,शेगांव |
| ०६ | अध्यक्ष, दे.राजा तालुका इंड.असो. दे.राजा | दे.राजा एमआयडीसी क्षेत्रात ३३ केव्ही उपकेंद्र सुरु करण्यांबाबत | दे.राजा एमआयडीसी साठी बुलडाणा विभागाच्या पायाभूत सुविधा आराखडयामध्ये प्रस्तावीत असलेल्या मौजे गिरोली येथील ३३/११ के.व्ही.उपकेंद्रामधून एमआयडीसी करीता स्वतंत्र एक्सप्रेस फिडर डीडीएफ मध्ये उभारण्यासाठीची कार्यवाही करता येईल असे कार्यकारी अभियंता, मराविविकं, बुलडाणा यांनी मागील बैठकीत सांगितले होते.<br>सदर ३३/११ के.व्ही.उपकेंद्रास मंजूरी मिळाली असुन सदर काम सरु झालेले असुन येत्या दोन महिन्यात काम पुर्ण होईल असे अधिक्षक अभियंता, मराविविकं, बुलडाणा यांनी बैठकीत सांगितले. | अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता, मराविविकंम, बुलडाणा |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०७ | अध्यक्ष, इंड.असो. खामगांव | ट्रायपार्टी ॲग्रीमेंट करीता कन्सेंट देण्यांबाबत | बँकेने टर्म लोन व खेळते भांडवल दोन्हींचा एकत्रीत मंजूरी आदेश दिल्यास त्याचा अंतर्भाव करारनाम्यामध्ये करण्यांस काहीच अडचण नसल्याचे श्री.ठाकरे, क्षेत्रव्यवस्थापक, मऔविम, अमरावती यांनी बैठकीत सांगितले असता यावर चर्चा होवुन सदर **विषय वगळण्यांत यावा असे ठरले.** | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती |
| ०८ | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असोसिएशन, चिखली | चिखली औद्योगिक कार्यक्षेत्रातील उद्योगांना सद्यस्थितीत पुर्ण वेळ विज पुरवठा मिळत नाही. तेव्हा स्वतंत्र फिडरची व्यवस्था व्हावी. | चिखली एमआयडीसी क्षेत्रासाठी सवतंः ३३/११ उपकेंद्र उभारण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मंजूर सबस्टेशन जमिनीची ५० % रक्कम भरली असून दोन ते तीन महिन्यात काम पुर्ण होईल असे अधिक्षक अभियंता, मराविविकं, बुलडाणा यांनी बैठकीत सांगितले. मा.अध्यक्ष यांनी सद्यस्थितीचा अहवाल जिल्हा उद्योग केंद्रास सादर करणे बाबत सुचित केले. | अधिक्षक अभियंता, /कार्यकारी अभियंता, मराविविमं,बुलडाणा |
| ०९ | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असोसिएशन, चिखली | चिखली औद्योगिक क्षेत्रात मे.फिरके ॲटोमोबाईल्सजवळील थांब्याकरीता एमआडीसीची जागा उपलब्ध करुन देणे बाबत. | मागील बैठकीत ठराल्याप्रमाणे मे.फिरके ॲटोमोबाईल्सच्या जवळ बसला थांबा मंजुर झाला असुन थांब्याजवळ प्रवासी निवारा बांधकामासाठी संघटनेने जागेची मागणी प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांचे कडे ऑन लाईन अर्ज भरुन करावी असे ठरले आहे.<br>सदर विषयावर चर्चा झाली असता ३ ते ४ बैठकांमध्ये हा विषय चर्चेकरीता असुन संघटनेने जागेची मागणी प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांचेकडे करावयाची आहे. संघटनेस जिउके तसेच प्रादेशीक अधिकारी,मऔविम, अमरावती यांनी लेखीपत्र देवुन जागेची मागणी ऑन लाईन अर्जाद्वारे करण्यांबाबत कळविले असल्याचे बैठकीत महाव्यवस्थापक,जिउकें यांनी सांगितले असता मा.अध्यक्ष यांनी पुन्हा एक वेळ संघटनेस लेखीपत्र देवुन कळविण्यांत यावे. संघटनेने पुढील बैठकीपर्यंत ऑन लाईन अर्ज न केल्यास सदर विषय वगळण्यांत यावा असे सुचित केले. | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी, असोसिएशन, चिखली.<br><br>प्रादेर्शिक अधिकारी, मऔविम, अमरावती |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १० | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असो. चिखली | चिखली औद्योगिक क्षेत्रामध्ये पोलीस चौकी स्थापन होणे बाबत. | ठाणेदार, चिखली यांनी पोलीस चौकी करीता जागा मिळणे बाबतचा ऑन लाईन अर्ज दि.२१/०७/२००९ ला केलेला असुन सदर ऑन लाईन अर्जामध्ये त्रृटी असून त्रृटी पुर्ण करण्यांबाबत ठाणेदार, चिखली यांना कळविले असल्याचे बैठकीत क्षेत्रव्यवस्थापक, मऔविम, अमरावती यांनी सांगितले असता सदर त्रृटीचे पत्र मिळाले नसल्याचे ठाणेदार चिखली यांनी सांगितले. यावर चर्चा होवुन मा.अध्यक्ष यांनी क्षेत्रव्यवस्थापक, मऔविम, अमरावती यांनी सदर पत्राची प्रत पुन्हा ठाणेदार,चिखली यांना पाठवुन त्यात नमूद केल्याप्रमाणे कागदपत्र पोलीस विभागाने पुर्ण करुन दयावे असे सांगितले व पुढील बैठकीपुर्वी सद्यस्थितीचा अहवाल जिउकेंला सादर करावा असे ठरले. | जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलडाणा ठाणेदार, पोलीस विभाग, चिखली प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती |
| ११ | अध्यक्ष, खामगांव इंड.असो.खामगांव | विक्रीकर विभागाने स्थानिक सल्लागार समिती स्थापन केली आहे तथापी मागील ३ वर्षात फक्त एकच सभा घेण्यांत आली आहे ती नियमित घेण्यांत यावी. | उप आयुक्त यांचे पद प्रभारी असल्यामुळे बैठका घेण्यांत आल्या नसल्याचे श्री.वाकोडे, निरीक्षक विक्रीकर विभाग, खामगांव यांनी बैठकीत सांगितले असता प्रभारी उप आयुक्त, विक्रीकर विभाग, खामगांव यांनी स्थानिक सल्लागार समितीची बैठक त्वरीत संघटनेच्या मागणीनुसार घेण्यांत यावी असे मागील बैठकीत ठरले होते.<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीस विक्रीकर कार्यालयाचे कोणीही प्रतिनिधी बैठकीस उपस्थित नसल्यामुळे मा.अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीचे अ.शा.पत्र देवुन कार्यवाही करणे बाबत सुचित करावे असे ठरले. | उप आयुक्त, विक्रीकर, खामगांव<br><br>जिउकें |

| अ.क्र | मुद्दा सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १२ | सरपंच, ग्रामपंचायत, सुटाळा | खामगांव एमआयडीसी क्षेत्रातील दुषित पाणी नदीत न सोडण्याबाबत. | मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे महाव्यवस्थापक, जिउकें व उप विभागीय अधिकारी, मराप्रनिमं, अकोला यांनी दि. १८/०७/२००९ ला खामगांव औद्योगिक क्षेत्रास प्रदूषणा बाबत भेट देवुन नदीमधील २ बॉटल पाण्याचे सॅम्पल घेण्यांत येवुन त्याचा सविस्तर अहवाल उप विभागीय अधिकारी, म.प्र.नि.मं., अकोला यांनी सादर करावयाचा होता.<br>दि.१३.११.२००९ च्या बैठकीत उप विभागीय अधिकारी, म.प्र.नि.मं.,अकोला यांनी सांगितले की, ज्या घटकाचे पाणी नदीचे पात्रात सोडल्या जाते त्या उद्योग घटकांना प्रदूषण रोखण्याबाबत समज देण्यांत आली असून उपाय योजना करण्यांबाबत मार्गदर्शन करण्यांत आले असून नदीतील सॅम्पल पाण्याचा अहवाल लवकरच सादर करण्यांत येईल असे सांगितले असता. मा.अध्यक्ष यांनी सद्यस्थितीचा लेखी अहवाल जिउकें कडे पाठवावा असे सुचित केले. | उप विभागीय अधिकारी, मराप्रनिमं, अकोला |
| १३ | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असो. चिखली | एमआयडीसी चिखली एरीयात संघटनेच्या कार्यालयास जागा मिळणे बाबत. | संघटनेने प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांचेशी चर्चा करुन त्यांचेकडे ऑन लाईन अर्ज करावा असे मा.अध्यक्ष यांनी मागील बेठकीत सुचित केलेले होते.<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीत या विषयावर चर्चा झाली असता सदर विषय मागील ३ ते ४ बैठकांपासुन चर्चेकरीता असून संघटनेस जागेची मागणी ऑन लाईन अर्ज करुन नोंदविण्यांबाबत जिउकें व प्रा.अ.,मऔविम, अमरावती यांनी कळविले असल्याचे महाव्यवस्थापक, जिउकें यांनी बैठकीत सांगितले असता मा.अध्यक्ष यांनी जिउकेंने पुन्हा पत्रव्यवहार करावा व पुढील बैठकीपुर्वी संघटनेस ऑन लाईन अर्ज करणे बाबत कळवावे व पुढील बैटकीपर्यंत संघटनेने अर्ज न केल्यास पुढील बैठकीतुन विषय वगळण्यांत यावा असे सुचित केले. | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असो. चिखली<br>प्रादेशिक अधिकारी, मऔविम,अमरावती<br>जिउकें |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १४ | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असो. चिखली | चिखली औद्योगिक क्षेत्रात फायर स्टेशनची सुविधा होणे बाबत. | दिनांक २७/०७/२००९च्या बैठकीत यावर चर्चा झाली असता सचिव, इंड.असो.चिखली यांनी बैठकीत सांगितले की, चिखली मार्केट कमिटी देखभाल करणार असल्याचे संमतीपत्र म.औ.वि.म. संघटनेने सादर केल्यामुळे तसा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, मऔविम, अकोला यांनी तयार करुन वरिष्ठ कार्यालयास मंजूरीसाठी सादर करावा .<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीत चर्चा झाली असता याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केलेला असल्याचे उप अभियंता, मऔविम, खामगांव यांनी बैठकीत सांगितले असता उप अभियंता, मऔविम, खामगांव यांनी त्यांचे वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव मंजूरी बाबत पाठपुरावा करुन सद्यस्थितीचा लेखी अहवाल जिउकें कडे पाठवीणे बाबत सुचित केले. | उप अभियंता, मऔविम, खामगांव |
| १५ | अध्यक्ष, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असो. चिखली | चिखली एमआयडीसी क्षेत्रात आयआयडी योजनेअंतर्गत विकास करण्यांबाबत. | चिखली औद्योगिक क्षेत्रातील IID चा प्रस्ताव रु. ५ कोटी रक्कमेचा होता परंतु प्रत्यक्षात २.३८ कोटीच केंद्रशासनाने मंजूर केलेले आहेत. उर्वरित रक्कमेची मागणी कार्यकारी अभियंता, मऔविम, अकोला यांनी करावी असा ठराव मागील बैठकीत पारीत करण्यांत आला होता.<br>मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे २.३८ कोटी वगळता उर्वरित रकमेची मागणी वरिष्ठ कार्यालयास केली असता २.३८ कोटी रक्कम अगोदर खर्च करावी व त्यानंतरच मागणी करावी असे वरिष्ठ कार्यालयाचे म्हणणे असल्याचे उप अभियंता, मऔविम यांनी सांगितले. तसेच २.३८ कोटीच्या कामाची निविदा काढली असुन सदर कामाकरीता एकच निवीदा प्राप्त झाल्यामळे पुन्हा निविदा काढाव्या लागतील असे ही सांगितले.<br>मा.अध्यक्ष यांनी सदर आयआयडी क्षेत्राच्या विकासासाठी स्वतः उपअभियंता/कार्यकारी अभियंता, मऔविम, यांनी प्रयत्न करावा व सद्यस्थितीचा लेखी अहवाल जिउकेंला पाठवावा करावा असे सुचित केले. | उप अभियंता /कार्यकारी अभियंता, मऔविम, खामगांव/ अकोला |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १६ | सचिव, मलकापूर ॲन्ड एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी इंड. असो. मलकापूर | मे.आशुतोश ॲग्रो इंड , मे.बी.पी.सावजी व इतर दोन उद्योगांचा विज पुरवठा शहरी विभागातील फिडर ऐवजी औद्योगिक फिडरवर जोडणे बाबत | दिनांक २७/७/२००९ च्या बैठकीत चर्चा होवुन सचिव, इंड.असो.मलकापुर यांनी मा.अध्यक्ष व आमदार, मलकापुर यांच्या निदर्शनास आणुन दिले की, या दोन घटकांचा विजेचा प्रश्नतर आहेच परंतु त्यासोबतच आजु बाजूला कापसावर आधारित उद्योग सुरु झाले आहेत. या सर्वासाठी क्लस्टर विकास योजनेअंतर्गत स्वतंत्र फिडरची व्यवस्था झाल्यास कायमचा प्रश्न सुटेल याबाबत उद्योजकांना मार्गदर्शन करुन त्यांचे इस्टीमेट घेवुन व स्थानिक महावितरणचे अधिका-यांशी चर्चा करुन पुढील बैठकीपुर्वी निर्णय घेण्यांत येईल असे सचिव, इंड.असो. मलकापुर यांनी बैठकीत सांगितले होते.<br>दि.१३/११/२००९ च्या बैठकीत संघटनेचे प्रतिनिधी यांनी काही तांत्रिक अडचणीमुळे उद्योजकांना मार्गदर्शन करुन व त्यांचे इस्टीमेंट घेण्यांचे काम पुर्ण होवू शकलेले नाही परंतु सदर काम पुर्ण करुन पुढील १० दिवसात अहवाल प्राप्त करुन देवु असे सांगितले. | कार्यकारी अभियता, मराविविकंम, मलकापूर<br>सचिव, मलकापूर ॲन्ड एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी इंड. असो. मलकापूर |
| १७ | शेगांव इंडस्ट्रीज असोसिएशन | शेगांव उपकेंद्रातील ११ केव्ही इंडस्ट्रीयल फिडरवर ११ केव्ही टाऊन १ फिडरनुसार लोड शेडींग करणे बाबत. | मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे सर्वोदय सहकारी औद्योगिक वसाहत, शेगांव मधील उद्याग घटक इंडस्ट्रीयल फिडर जोडण्याचे काम येत्या १ महिन्यात पुर्ण होईल असे कार्यकारी अभियंता, मराविविकं, खामगांव यांनी बैठकीत सांगितले असता संघटनेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. | अधिक्षक अभियंता, मराविविकं, बुलडाणा<br>कार्यकारी अभियंता, मराविविकं., खामगांव |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १८ | अध्यक्ष, खामगांव इंड.असो.खामगांव | ऊर्जा मित्र बैठकीचे आयोजना बाबत. | ऊर्जा मित्रचे बैठकीचे आयोजन करण्यांबाबत मागील बैठकीत ठरलेले होते. परंतु अद्योप पावेतो बैठक न आयोजित केल्यामुळे मा.अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली व यापुढे किमान तिन महिन्यातून एक वेळ बैठक ठेवावी व त्या बैठकीमध्ये उद्योजकांचे प्रश्न निकाली काढावे व तसा लेखी अनुपालन अहवाल जिउकें कडे पाठवावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचित केले | अधिक्षक अभियंता, मराविविकं, बुलडाणा |
| १९ | अध्यक्ष, खामगांव इंड.असो.खामगांव | उद्योजकांच्या सोई करीता म.प्र.नि.मं. कार्यालयाचे प्रतिनिधीने बुलडाणा येथे आठवडयातुन एक दिवस हजर राहणे बाबत. | अध्यक्ष, खामगांव इंड.असो.खामगांव व इतर संघटनांनी बैठकीत सागितले की, प्रत्येक कामाकरीता उद्योजकांना म.प्र.नि.मं.अकोला येथे जावे लागते. म.प्र.नि.मं.कार्यालयाचे अधिकारी यांनी आठवठयातुन एक दिवस ठरवुन बुलडाणा जिउकें मध्ये आल्यास व उद्योजकांची कामे येथे स्विकारुन दुस-या आठवडयात ती कामे पुर्ण करुन दिल्यास उद्योजकांचा अकोला येथे जाण्यायेण्याचा त्रास कमी होईल. म.प्र.नि.मं.ने जिल्हयातील संघटनांचे मागणीप्रमाणे म.प्र.नि.मं. कार्यालयाने आठवडयातुन एक दिवस बुलडाणा येथे उद्योजकांच्या सोई करीता यावे असे मा.अध्यक्ष यांनी मागील बैठकीत सुचित केलेले होते.<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीत चर्चा झाली असता अध्यक्ष,इंड.असो.खामगांव व उपविभागीय अधिकारी, म.प्र.नि.म. यांनी एकत्रित चर्चा करुन उद्योजकांच्या सोईकरीता खामगांव येथे महिन्यातील एक दिवस ठरवावा व तसा अहवाल उपविभागीय अधिकारी, म.प्र.नि.मं., अकोला यांनी एक आठवडयाच्या आत सादर करावा असे ठरले. | उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मं., अकोला व अध्यक्ष, खामगांव इंड.असो. |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| २० | अध्यक्ष, खामगांव इंड.असो.खामगांव | औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाने खामगांने कॅम्पचे आयोजन करण्यांबाबत तसेच उद्योजकांच्या सोई करीता आठवडयातील एक दिवस ठरवुन जिउकें, बुलडाणा येथे उद्योजकांच्या मार्गदर्शनाकरीता हजर राहणे बाबत. | औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाने खामगांव येथे कॅम्पचे आयोजन करण्यांबाबत तसेच उद्योजकांच्या सोई करीता आठवडयातील एक दिवस ठरवुन जिउकें, बुलडाणा येथे मार्गदर्शनाकरीता हजर राहणे बाबत बैठकीत चर्चा झालेली आहे.<br>अकोला विभागाअंतर्गत अकोला,बुलडाणा, यवतमाळ व वाशिम जिल्हयाकंकरीता आकृतिबंध आराखडयाप्रमाणे ४ अधिकारी व अमरावती जिल्हयाकरीता १ अशा एकूण ५ जागा रिक्त असल्यामुळे सध्यातरी खामगांव येथे कॅम्पचे आयोजनासाठी कोणत्याही अधिका-याची नियुक्ती करणे शक्य नाही असे सह संचालक, औद्यो.सुरक्षा व आरोग्य, अकोला यांनी त्यांचे दि.१९/०६/२००९ चे पत्रानुसार कळविले असल्याचे महाव्यवस्थापक, जिउकें यांनी बैठकीत सांगितले.<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीत यावर चर्चा होवुन प्रथम खामगांव येथे एका कॅम्पचे आयोजन करावे व रिक्त असलेली पदे भरल्यानंतर महिन्यातील एक दिवस ठरवुन उद्योजकांचे मार्गदर्शनासाठी खामगांव येथे भेट देण्यांची कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचित केले. | सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग, अकोला<br><br>जिउकें |
| २१ | विद्युत कर निरीक्षक, उद्योग ऊर्जा व कामगार खाते, अमरावती | विद्युत शुल्क माफी करीता लागणा-या लागदपत्रांची पुर्तता विद्युत कर निरीक्षक, उद्योग ऊर्जा व कामगार खाते,अमरावती याचेंकडे करण्यांबाबत. | सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत ज्या घटकांना पात्रता प्रमाणपत्र देण्यांत येते त्या पात्र घटकांनी विद्युत कर निरीक्षक यांचे कडे विद्युत शुल्क माफी साठी वेगळा अर्ज करुन लागणा-या कागदपत्रांची पुर्तता करुन देणे आवश्यक असल्याचे विद्युत कर निरीक्षक, यांनी बैठकीत सांगितले असता सर्व औद्योगिक संघटनांनी विरोध दर्शविला होता.<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीत या विषयावर चर्चा झाली असता श्री.डेकाटे, सहाय्यक विजकर निरीक्षक, अमरावती यांनी सांगितले की, सामुहीक प्रोत्साहन योजनेअंतर्गत पात्रता प्रमाणपत्र दिलेल्या घटकांना यापुढे वेगळे कागदपत्र मागितल्या जाणार नसल्याचे बैठकीत सांगितले त्यामुळे **सदर विषय बैठकीतुन वगळण्यांत यावा असे ठरले.** | विद्युत कर निरीक्षक, उद्योग ऊर्जा व कामगार खाते, अमरावती |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| २२ | मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, बुलडाणा | खामगांव औद्योगिक क्षेत्रात फायर स्टेशनची सुविधा होणे बाबत. | खामगांव औद्योगिक क्षेत्राकरीता फायर स्टेशनची सुविधा नसल्यामुळे अध्यक्ष, इंड.असो.खामगांव यांनी फायर स्टेशन संघटनेच्या ताब्यात दिल्यानंतर त्याची देखभाल व त्यावरील खर्च संघटनेला करावा लागणार असल्यामुळे सदर देखभाल व त्यावरील खर्च संघटना करण्यांस तयार असल्याचे संमतीपत्र संघटनेने उप अभियंता, मऔविम, खामगांव यांना देणे बाबत मागील बैठकीत मा.अध्यक्ष यांनी सुचित केले.ले होते.<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीत या विषयावर चर्चा झाली असता सदर विषय खामगांव औद्योगीक संघटनेने मांडला नसल्याचे श्री टावरी अध्यक्ष, खामगांव इंड.असो. यांनी बैठकीत सांगितले त्यामुळे **विषय वगळण्यांत यावा असे ठरले.** | अध्यक्ष, खामगांव इंड.असो. |
| २३ | सचिव, चिखली एमआयडीसी उद्योजक कल्याणकारी असो. चिखली | चिखली एमआयडीसी एरीयातील उद्योजकांना होत असलेल्या अशुध्द पाण्याबाबत. | चिखली विकास केंद्रातील जलशुध्दीकरण केंद्रातील क्लोरीनेटर किरकोळ दुरुस्ती करीता पाठविले होते तेथील मिटर काढुन नेलेले नाही व एरीयेशन फाऊंटेन मध्ये तुरटी टाकण्यांत येत असून संम्प मध्ये ब्लिचींग पावडर टाकुन उद्योजकांना शुध्द पाण्याचा पुरवठा पुर्ववत सुरु असल्याचे उप अभियंता, मऔविम, खामगांव यांनी बैठकीत सांगितले **त्यामुळे विषय वगळण्यांत यावा असे ठरले.** | |
| २४ | मे.बालाजी अॅग्रो टेक इंडस्ट्रीज, सी-१२, एमआयडीसी चिखली | खंडीत विज पुरवठया बाबत. | घटकास ट्रॅान्सफॉर्मर बदलवुन दिला असल्याचे अधिक्षक अभियंता, मराविविकं, बुलडाणा यांनी बैठकीत सांगितले त्यामुळे **विषय वगळण्यांत यावा असे ठरले.** | |
| २५ | मे.वैभव जिनिंग फॅक्ट्री, प्लॉट नं.ई-१ एमआयडीसी, चिखली | रोड होण्यांबाबत. | प्लॉट क्रमांक ई-१ पर्यंत जाण्यांस रोड करण्यांचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठविण्यांत आला असल्याचे उप अभियंता, मऔविम, खामगांव यांनी सांगितले असता मा.अध्यक्ष यांनी उप अभियंता यांनी प्रस्ताव मंजूरीसाठी स्वत:पाठपुरावा करावा व अनुपालन अहवाल पाठवावा असे सुचित केले. | उप अभियंता, मऔविम, खामगांव |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| २६ | सचिव, इंड.असो. मलकापुर | रॉयल्टी माफी बाबत | उद्योजक त्यांच्या भुखंडावर शेडचे बांधकामा करिता पायाचे खोदकाम करतांना जो मुरुम निघतो तो मुरुम त्याच बांधकामामध्ये वापर करतो. परंतू भुखंडावर खोदकाम करतांना जो मुरुम निघतो त्यावर जिल्हयातील तहसिलदार, रॉयल्टी लावत असतात त्यावर रॉयल्टी न लावण्याबाबत चर्चा झाली असता मा.अध्यक्ष यांनी या विषयावर स्वतः लक्ष देतो असे सागितले. | उप अविभागीय अधिकारी, मलकापुर सर्व तहसिलदार |
| २७ | महाव्यवस्थापक , जिउकें | सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत बद पडलेल्या घटकाकडील शासनाची देय असलेली रक्कम जिल्ला उद्योग केंद्रास कळविणे बाबत. | सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत बंद पडलेल्या एखादा उद्योगाची जागा दुस-या उद्योजकांस खरेदी करावयाची असते. खरेदी करतांना जिल्हा उद्योग केंद्राचे नाहरकत प्रमाणपत्र मागविण्यांत येते. अशा परिस्थितीत सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत पुर्वीच्या घटकाने किती सेल्स टॅक्सचा उपयोग घेतला व त्यावरील व्याज अशी किती रक्कम बंद घटकाकडुन वसुल करावयाची आहे याबाबतची माहिती उप आयुक्त, विक्रीकर विभाग, खामगांव यांचेकडुन मागविण्यांत येते परंतु सदर माहिती वेळेवर प्राप्त होत नसल्याचे महाव्यवस्थापक, जिउकें यांनी बैठकीला उपस्थित असलेले श्री.वाकोडे, निरीक्षक विक्री कर विभाग यांच्या निदर्शनास आणुन दिले असता यापुढे माहिती वेळेवर सादर करण्यांत येईल असे श्री.वाकोडे, निरीक्षक विक्रीकर विभाग, खामगांव यांनी मागील बैठकीत सांगितले आहे.<br>दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीस सदर विभागाचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नसल्यामुळे सद्यस्थिती कळू शकली नाही. त्यामुळे मा.अध्यक्ष यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून विक्री कर विभागाच्या वरिष्ठ कार्यालयास मा.अध्यक्ष यांच्या सहीचे अ.शा.पत्र पाठवुन बैठकीला प्रतिनिधी पाठविण्यांबाबत विनंती करावी असे ठरले. | उप आयुक्त विक्रीकर विभाग, खामगांव |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| २८ | खामगांव एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन | विद्युत बिले उद्योग घटकांना उशिरा मिळणे बाबत. | उद्योग घटकांना विद्युत बिल मिळाल्यापासुन ७ दिवसाचा कालावधी बिल भरण्यास पकडावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचित केले व **विषय वगळण्यांत यावा असे ठरले.** | कार्यकारी अभियंता, मराविविकं. खामगांव |
| २९ | खामगांव एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन | विद्युत बिले भरण्यांबाबत | विद्युत बिले भरण्याची सुविधा एमआयडीसीतील सबस्टेशन येथे उपलब्ध करण्यांबाबतची मागणी अमान्य करण्यात आली. परंतु जो कर्मचारी बिल वाटपाकरीता येईल त्या कर्मचा-याजवळ ॲडव्हान्स चेक दयावा असे ठरले **व विषय वगळण्यांत यावा असे ठरले.** | कार्यकारी अभियंता, मराविविकं. खामगांव |
| ३० | खामगांव एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन | भार नियमना बाबत | भार नियमनाच्या दिवशी सिंगल फेज वरुन विद्युत पुरवठा संध्याकाळी ६.०० वाजेपासुन करण्यांस मान्य करण्यांत आले त्यामुळे **विषय वगळण्यांत यावा असे ठरले.** | कार्यकारी अभियंता, मराविविकं. खामगांव |
| ३१ | खामगांव एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन | अतिक्रमन हटविने बाबत. | एमआयडीसी एरीयातील रोडवरील अतिक्रमनामुळे रहदारीस अडथळा येत असल्याने रोडवरील अतिक्रमन तसेच मटन व मासोळीची दुकाने उठविणे बाबत बैठकीत चर्चा झाली असता उप अभियंता, मऔविम, खामगांव यांनी पोलीस विभागास तक्रार करुन अतिक्रमन उठविणे बाबत कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचित केले. | उप अभियंता, मऔविम, खामगांव |
| ३२ | खामगांव एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन | बायपास रस्त्यावरील जलद वाहतुकीमुळे रोडवर स्पिड ब्रेकर लावण्यांबाबत. | एमआयडीसी मधुन नॅशनल हायवे बाय पास वरुन वेगाने जड वाहतुक होत असल्यामुळे अपघाताच्या दृष्टीने रोडवर स्पिड ब्रेकर व रोड सुरक्षा फलक लावण्यांबाबत मागणी झाली असता उप अभियंता, मऔविम, यांनी सदर काम करुन देतो असे सांगितले. | उप अभियंता, मऔविम, खामगांव |
| ३३ | खामगांव एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन | विक्री कराबाबत | मागील ३ वर्षापासुन उद्योजक सी फॉर्म विक्रीकर विभागाला सादर करीत आहेत. सी फॉर्म सादर करण्यांच्या सुविधेत सुलभीकरण करणे आवश्यक असल्याची मागणी झाली. परंतु बैठकीस विक्रीकर विभागाचे कोणीही उपस्थित नसल्यामुळे मा.अध्यक्ष यांनी अ.शा.पत्राने कळविण्यांबाबत सुचित केले. | उप आयुक्त, विक्रीकर विभाग, खामगांव जिउकें |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| ३४ | बुलडाणा एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन | येळगांव एमआयडीसी एरीयातील वाटप केलेले भुखंड परत घेणे बाबत. | येळगांव एमआयडीसी एरीयात १९९६ च्या दरम्यान भुखंड वाटप करण्यांत आलेले आहेत. परंतु अद्याप पावेतो उद्योग घटकाने उद्योग सुरु केलेले नाहीत. अशा भुखंड धारकांकडुन भुखंड परत घेवुन गरजु उद्योजकांना भुखंड वाटप करणे आवश्यक असल्याची मागणी बैठकीत झाली असता ज्या उद्योजकांना भुखंड वाटप करण्यांत आले परंतु सद्यस्थितीत सदर भुखंडावर उद्योग सुरु करण्यांच्या दृष्टीने काहीही कार्यवाही झालेली नाही अशा उद्योजकांची स्वतंत्र बैठक प्रोदेशिक अधिकारी /क्षेत्रव्यवस्थापक, मऔविम, यांनी आयोजित करावी व त्या उद्योजकांना ३१/३/२०१० पुर्वी सदर भुखंडावर उद्योग सुरु करण्यांस मार्गदर्शन करावे व एप्रिल २०१० मध्ये सदर भुखंड परत घेवुन नविन उद्योजकांना वाटप करावेत असे मा.अध्यक्ष यांनी सुचित केले. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती क्षेत्रव्यवस्थापक, मऔविम, बुलडाणा |
| ३५ | उप अभियंता, मऔविम, खामगांव | तांदुळवाडी बंधा-यावरील पंपीग जोडणीवरील लोडशेडींग कमी करणे बाबत. | तादुंळवाडी फिडर हे पिंपळगांवराजा सबस्टेशन मधुन देण्यांत आलेले असुन त्यावर ग्रामीण भारनियमानाप्रमाणे दररोज १२ तास लोडशेडींग करण्यांत येते. पाणीपुरवठयाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेवुन या जोडणीवरील भरनियमन दररोज ६ तास करण्यांत यावे अशी मागणी उप अभियंता, मऔविम, यांनी केली असता पाहणी करुन सद्यस्थितीत काय करता येईल याचा निर्णय घेण्यांत येईल असे बैठकीत अधिक्षक अभियंता, मराविविकं यांनी सांगितले. | अधिक्षक अभियंता, मराविविकं, बुलडाणा |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| ३६ | मा.आमदार, बुलडाणा मतदार संघ | बुलडाणा व मोताळा तालुक्यातील राष्ट्रीयकृत बॅकांची कर्ज मंजूरीची उदासिनता व त्रासा बाबत. | मा.आमदार, बुलडाणा मतदार संघ, यांनी सभागृहाचे लक्षात आणुन दिले की, बुलडाणा व मोताळा तसेच जिल्हयातील इतर तालुक्यातील राष्ट्रीयकृत बॅकां लाभार्थ्यांना कर्ज मंजूर करते वेळी खुप त्रास देतात, बरेच दिवस कर्ज प्रकरण बॅकांमध्ये प्रलंबीत ठवुन लाभार्थ्यांना बँकेत चकरा माराव्या लागतात अशा ब-याच तक्रारी माझ्याकडे येत असल्याचे बैठकीत सांगितले.<br>यावर बैठकीत चर्चा होवुन श्री.मिश्रा, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, सी.बी.आय. बुलडाणा यांनी बैठकीत सांगितले की, सर्व योजनाचा आढावा तालुका स्तरावरील बी.एल.बी.सी.बैठक / मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समन्वय समिती बैठकीत घेतला जातो. मा.आमदार महोदयांकडे जशा तक्रारी आल्या आहेत तशा तक्रारी काही शाखेबाबत माझेकडे सुध्दा आल्या असुन त्या बॅकांचे शाधिकारी यांना मा.जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समन्वय समिती बैठकीस त्यांना बोलावुन प्रगतीचा आढावा घेण्यांत येईल. तसेच जिल्हयातील सर्व शाखांना कर्ज प्रकरणांचा निपटारा १५ दिवसाचे आत करण्यांबाबत कळविण्यांत येईल असे सांगितले. | अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, सी.बी.आय. बुलडाणा |
| ३७ | मा.आमदार, बुलडाणा मतदार संघ | सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत कॅश सबसिडी लागू करण्यांबाबत. | मा.आमदार, बुलडाणा मतदार संध, यांनी बैठकीत सांगितले की, बुलडाणा जिल्हयात खामगांव वगळता इतर तालुक्यात पाहिजे तसे उद्योग नाही म्हणजेच उद्योगाचा अनुशेष आहे. सदर अनुषेष काढुन टाकण्याकरीता बुलडाणा जिल्हयाकरीता सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अंतर्गत कॅश सबसिडी व इतर सवलती देणे आवश्यक आहे. परंतु शासनाने कॅश सबसिडी देण्यांचे धोरण रद् केलेले आहे | जिउकें |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| | | | शासनाने उद्योगाचा अनुशेष असलेल्या जिल्हयाकरीता स्वतंत्र योजना तयार करावी जेणे करुन सवलतीमुळे जिल्हयात उद्योग उभे राहतील व उद्योगाचा अनुशेष दुर होईल अशी मागणी बैठकीत केली असता मा.अध्यक्ष यांनी सदर विषय धोरणात्मक असल्याने महाव्यवस्थापक, जिउकें यांनी तसा प्रस्ताव तयार करुन उद्योग संचालनालयाकडे पाठवावा असे सुचित केले. | |
| ३८ | मा.आमदार, बुलडाणा मतदार संघ | एमआयडीसी क्षेत्रातील बंद पडलेल्या उद्योगाचे जागे बाबत. | एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात भुखंड घेवुन काही उद्योग सुरु झालेत व त्यानंतर शासनाच्या विविध योजनेअंतर्गत फायदे घेवुन शासनाच्या नियम व अटी प्रमाणे उद्योग सुरु न ठेवता ते घटक बंद पडले आहेत. बंद पडलेल्या घटकाचे मालकाकडे शासनाचे घेणे असल्यामुळे सदर जागा दुस-या उद्योजकांस विकत घेतांना बंद घटका कडील थकबाकी दयावी लागत असल्याने अडचणी येत असल्याचे मा.आमदार यांनी बैठकीत सांगितले असता उद्योजकांना येणा-या अडचणी लक्षात घेवुन शासनाने धोरणात बदल करुन बंद पडलेल्या उद्योगाची जागा इतर उद्योजकांना वाटप करण्यांस मोकळी करुन घ्यावी जेणे करुन उद्योग सुरु करणा-यांना जागा त्वरीत उपलब्ध होवुन बंद पडलेल्या उद्योगाचे जागेवर नविन उद्योग सुरु होतील अशी मागणी केली असता सदरचा विषय धोरणात्मक असल्यामुळे मा.अध्यक्ष यांनी महावस्थापक, जिउकें यांनी तसा प्रस्ताव उद्योग संचालनालयास सादर करावा असे सुचित केले. | जिउकें |

| अ.क्र | मुद्या सबंधीत संस्था | विषय | दिनांक १३/११/२००९ च्या बैठकीचा निर्णय | कार्यवाही सबंधित यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| ३९ | सरपंच, ग्रामपंचायत, दसरखेड ता.मलकापुर | बेंन्झोकेम प्रा.लि.ही कंपनी त्वरीत बंद करणे बाबत. | सदर घटकापासुन अत्यंत दुषीत विषारी वायु व अत्यंत केमिकलयुक्त पाणी बाहेरच्या वातावरणात सर्रास सोडत आहे. आजुबाजूला असलेल्या कंपन्या व इतर उद्योजक यांना सुध्दा याचा त्रास उद्‌भवत आहे. त्यामुळे वातारण तसेच जमीन प्रदूषीत होत आहे असल्याची तक्रार मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाली असल्याची माहिती बैठकीत देवुन उप विभागीय अधिकारी, म.प्र.नि.मं., अकोला यांनी आजच मलकापुर येथे जावुन उद्योग घटकास भेट देवुन कार्यवाही करावी व तसा अहवाल जिल्हाधिकारी व जिउकें ला सादर करावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचित केले. | उपविभगीय अधिकारी, म.प्र.नि.मं., अकोला |

शेवटी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

स्वाक्षरी
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग मित्र समिती, बुलडाणा

स्वाक्षरी
जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,जिल्हा उद्योग मित्र समिती,
बुलडाणा